# एस्. मोहिंदर - भाग १



सरदार मोहिंदर सिंग यांनी हिंदी चित्रपटांना खूप श्रवणीय गाणी दिली. त्यापैकी काहींची यादी मी पुढे दिली आहे. खरोखर त्यांना आपल्यासाठी खूप गाणी देता आली असती परंतु ती देता आली नाहीत. याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे त्यांनी पंजाबी चित्रपटांसाठी बरेच संगीत दिग्दर्शन केले. त्यांपैकी काही म्हणजे अभिनेता दारा सिंगचा 'नानक नाम जहाज है' आणि धर्मेंद्र, राजेंद्र कुमार आणि इतर अभिनेते असलेला व छान छान गाणी असलेला 'तेरी मेरी एक जिंदरी' हे चित्रपट होय. दुसरे कारण म्हणजे हा संगीतकार अमेरिकेला निघून गेला. हिंदी चित्रपटांसाठी त्यांचे योगदान कमी होते असे म्हणता येणार नाही कारण त्यांनी जवळ जवळ २८ चित्रपटांना संगीत दिले आहे.

१९४८ साली प्रदर्शित झालेला 'सेहरा' हा अरुण प्रॉडक्शनचा चित्रपट हा त्यांचा पहिला चित्रपट म्हणता येईल. त्यानंतर त्यांनी 'शादी की रात' सारख्या एक-दोन लहान बजेटच्या चित्रपटांचे काम केले. १९५३ साली प्रदर्शित झालेल्या 'पापी' ह्या चित्रपटातील 'तेरा काम है जलना परवाने' हे रफीने म्हटलेले गाणे खूपच गाजले आणि त्यानंतर त्यांना उदंड यश मिळाले. हे गाणे राजिंदर किशन यांनी लिहिले होते.

या गाण्याच्या यशानंतर त्यांचा आत्मविश्वास दुणावला आणि त्यांनी त्यानंतर बरीच गाणी फारच सुरेखरित्या संगीतबद्ध केली आणि रसिक श्रोत्यांनी त्यांना भरभरून प्रतिसादही दिला. अजूनही त्यांची काही गाणी लोक आवर्जून ऐकतात. आनंद घेतात.

‘ऐ रात के मुसाफिर, पलभर को दम तो ले ले’ (लता) आणि ‘आजा तुझे मोहब्बत आवाज दे रही है’ (तलत) ही ‘कारवाँ’ चित्रपटातील दोन संस्मरणीय गाणी तुमच्या मनात असतील. विशेष म्हणजे ‘आजा’ हा शब्द त्यांनी तलतकडून पुन्हा पुन्हा किती आर्जवाने म्हणवून घेतला आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. परंतु ‘शिरीन फरहाद’ या चित्रपटातील गीतसौंदर्याच्या उधळणीमुळेच ह्या संगीतकाराला उच्च शिखरावर नेऊन ठेवले. त्यांपैकी काही गाण्यांतील लताने गायलेले ‘गुजरा हुआ जमाना, आता नही दुबारा, हाफिज खुदा तुम्हारा’ हे अप्रतिम गाणे ! तन्वीर नक्वी यांच्या या झपाटलेल्या गाण्याने आपली अशी एक खास सन्मानाची जागा तयार केली आणि लताने आजवर गायलेल्या गाण्यांतील तिचेही हे एक खास गाणे म्हणता येईल. ह्या गाण्याखेरीज तलतने गायलेले ‘सुनाऊ किसको अफसाना, ना अपना है ना बेगाना’ हे गाणेही अस्सल खजान्यातले म्हणून गणले जाईल.

‘आँखोंमे तुम्हारे जलवे है’ (रफी आणि कोरस) ही ह्या प्रेमकहाणीतील सदाबहार कव्वाली, तसेच रफीने गायलेले ‘हजारो रंग बदलेगा जमाना’ हे वरच्या पट्टीत रचलेले गाणे ! शिवाय या चित्रपटातील आणखी दोन अविस्मरणीय गाणी म्हणजे हेमंत व आशा यांचे ’ऐ दिलरुबा, जान-ए-वफा’ आणि ’आ आ जा, आ जा ओ जान-ए-वफा...सुन ले तू मेरी सदा’ हे हेमंत व लता यांच्या गूढरम्य आवाजातील गाणे. ही दोन्ही गाणी श्रोते आजही आनंदाने ऐकतात. ह्या सर्व गाण्यांमुळे सरदार मोहिंदर सिंग यांनी स्वरबध्द केलेला ‘शिरीन फरहाद’ हा चित्रपट त्यांच्या कारकीर्दीतील उत्कृष्ट संगीतबद्ध केलेला चित्रपट म्हणून ओळखला जाईल.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories”

is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com